# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचा नागपूर शहरामध्ये विविध कामांचे
**{हॉट मिक्स प्लॉन्ट विभाग}** उद्घाटन संबंधाने दि. 11/12/2022 रोजी दौरा होता. सदर दौ-या करीता नागपूर शहरातील अनुषांगीक व्यवस्थेबाबत मा. मुख्यमंत्री व मा. उप-मुख्यमंत्री यांनी अधिका-यासोबत संबंधित क्षेत्राची मौका पाहणी दि. 10/12/2022 रोजी केली. मौका पाहणी दरम्यान मा. पंतप्रधान यांचे दौ-याचे संबंधाने समृद्धी महामार्गाला जाण्याचा मार्ग मिहानमधील टि.सी.एस. ऑफिस ते स्मार्ट डाटा लि. या रस्त्याने आवागमन असल्यामुळे व मा. पंतप्रधान यांची सुरक्षा सर्वोच्च असल्याने सदर रस्त्याचे त्यावेळेस सुरक्षेचे दृष्टीने व सुलभ वाहतूकीचे दृष्टीने त्वरित डांबरीकरण करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री व मा. उप. मुख्यमंत्री यांनी दिले. त्यानुसार सदर रस्त्याचे तात्काळ एका रात्रीत डांबरीकरण करण्याचे निर्देश मा. जिल्हाधिकारी व मा. आयुक्त, मनपा यांनी दि. 10/12/2022 चे सायंकाळी सदर पाहणी दरम्यान म.न.पा. यंत्रणेस दिले होते.

या अनुषंगाने सदर काम मा. पंतप्रधान यांचे दौ-यापूर्वी संपूर्ण प्रक्रिया करुन पूर्ण करणे शक्य नसल्याने मा. प्रशासक तथा आयुक्त म.न.पा. नागपूर यांनी सदर काम म.न.पा. हॉट मिक्स प्लॉन्ट तर्फे व उपलब्ध होतील त्या कंत्राटदारामार्फत त्वरित करुन घेण्याचे निर्देशित केले. या अनुषंगाने सदर कामाचे क्षेत्र मिहान मध्ये असून नागपूर महानगरपालिका क्षेत्रा बाहेरील आहे. कामाचे स्थळ नागपूर महानगरपालिका हद्दिबाहेर तसेच अधिकार क्षेत्राबाहेरील असल्याने सदर काम करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 अन्वये (स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध संपादन करणे व त्यांचा विनियोग करणे यासंबंधीच्या संविदा धरून, या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी संविदा करण्याच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील त्या अशा :- (अ) आयुक्त, महानगरपालिकेच्यावतीने अशी प्रत्येक संविदा करील; (With respect to the making of contracts under or for any purpose of this Act, including contracts relating to the acquisition and disposal of immovable property or any interest therein, the following provisions shall have effect, namely :- (a) Every such contract shall be made on behalf of the corporation by the Commissioner) व कलम 89 अन्वये (महानगरपालिकेने नगरपालिका निधीमधून करावयाचा खर्च, या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, फक्त शहरातच केला जाईल, परंतु एकूण सदस्यांपैकी निम्म्याहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या महानगरपालिकेच्या ठरावाव्दारे असा खर्च या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी शहराच्या बाहेर करता येईल. (Expenditure by the Corporation out of the Municipal Fund shall, save as otherwise provided by this Act, be made within the City only, but may, by a resolution of the Corporation supported by not less than half the total number of councillors, be made outside the City for any of the purposes of this Act.) काम करणे व या कामांना म.न.पा. अधिनियम प्रकरण ड नियम (2) अन्वये विना निविदा स्था. समिती च्या मंजुरी अन्वये कार्योत्तर मान्यता प्रदान करणे. या अनुषंगाने पूढील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

1) मिहान येथिल TCS Office to Smart Data Enterprises Ltd Square in MIHAN Nagpur पर्यंत 2 Km चा रस्ता डांबरीकरण कामाकरीता कंत्राटदारामार्फत करण्यात आलेल्या कामाचे विस्तृत प्राकलन रु. 11,25,000/- + रु. 2,02,500/- (GST 18% व इतर) असे एकूण रु. 13,60,350/- (प्राकलन संलग्न आहे.) झालेला खर्च यास कार्योत्तर मान्यता प्रदान करणे तथा व्यवस्थापकीय संचालक MIHAN India Ltd. यांना झालेल्या खर्चाची मागणी करणेबाबतचे पत्र पाठविण्यास्तव प्रस्तावित आहे.
2) म.न.पा. हॉट मिक्स प्लॉन्ट विभागाव्दारा उपरोक्त दिलेल्या निर्देशानुसार म.न.पा. हद्दिबाहेर मिहान येथे केलेल्या 1185.90 चौ.मी. डांबरीकरण कामाकरीता रु. 3,57,869/- + रु. 64,416/- (GST 18%) असे एकूण रु. 4,22,285/- झालेला खर्च यास कार्योत्तर मान्यता प्रदान करणे तथा

व्यवस्थापकीय संचालक MIHAN India Ltd. यांना झालेल्या खर्चाची मागणी करणेबाबतचे पत्र पाठविण्यास्तव प्रस्तावित आहे.

3) म.न.पा. हॉट मिक्स प्लॉन्ट विभागाव्दारा उपरोक्त प्रमाणे प्राप्त निर्देशानुसार मा. पंतप्रधान यांचे आगमनानिमित्याने एअरपोर्ट येथील व्हि.आय.पी. प्रवेश व्दार येथील खराब रस्ता सुस्थितीत करण्याकरीता केलेल्या 1753.50 चौ.मी. डांबरीकरण कामाकरीता रु. 5,58,963/- + रु. 1,00,613/- (GST 18%) असे एकूण रु. 6,59,577/- झालेला खर्च यास कार्योत्तर मान्यता प्रदान करणे तथा व्यवस्थापकीय संचालक MIHAN India Ltd. यांना झालेल्या खर्चाची मागणी करणेबाबतचे पत्र पाठविण्यास्तव प्रस्तावित आहे.
4) तसेच Asphalting of Road From TCS Office to Smart Data Enterprises Ltd Square in MIHAN Nagpur येथील 2 Km च्या रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम अंत्यत तातडीने मा. पंतप्रधान यांचे दौ-यापूर्वी एका रात्रीत करावयाचे असल्याने त्यावेळी उपलब्ध झालेले नागपूर महानगरपालिकेचे अधिकृत कंत्राटदार M/s Premachan Rachumal, यांच्याव्दारे काम करण्यात आले. त्यानुसार M/s Premachan Rachumal, यांना प्राकलनिय दराने (at Par) रु. 13,60,350/- (GST +Testing +Insurence) राशीचा कार्योत्तर मंजूरी प्रदान करणेसह ठराव कार्यान्वित करुन कार्यादेश प्रदान करणे.

करिता सदर काम करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 अन्वये कराराबाबत, व कलम 89 अन्वये काम करणे(म.न.पा सभागृहाचा कालावधी दिनांक 02.03.2022 रोजी संपुष्टात आल्याने नागपूर महानगरपालिकेत प्रशासकीय राजवट असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 चे पोटकलम 2(क) अन्वये महानगरपालिका व सर्व समित्या यांचे सर्व अधिकार व कर्तव्ये मा.प्रशासक यांना असल्याने"सदस्यांपैकी निम्म्याहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या महानगरपालिकेच्या ठरावाव्दारे अश्या खर्चास मंजुरी घेणे" हि अट लागू असणार नाही) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे परिशिष्ट ड प्रकरण ५ चे कलम २ चे पोटकलम २ च्या परंतुकातील तरतुदी अनुसार 452 चे पोटकलम 2(क) अन्वये, विना निविदा केलेल्या अतितातडीच्या कामास कार्योत्तर मान्यता प्रदान करणे. उपरोक्त नमुद 1 ते 4 प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेण्याबाबत.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 239/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 28/12/2022

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, हॉट मिक्स प्लॉन्ट विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचा नागपूर शहरामध्ये विविध कामांचे उद्‌घाटन संबंधाने दि. 11/12/2022 रोजी दौरा होता. सदर दौ-या करीता नागपूर शहरातील अनुषांगीक व्यवस्थेबाबत मा. मुख्यमंत्री व मा. उप-मुख्यमंत्री यांनी अधिका-यासोबत संबंधित क्षेत्राची मौका पाहणी दि. 10/12/2022 रोजी केली. मौका पाहणी दरम्यान मा. पंतप्रधान यांचे दौ-याचे संबंधाने समृद्धी महामार्गाला जाण्याचा मार्ग मिहानमधील टि.सी.एस. ऑफिस ते स्मार्ट डाटा लि. या रस्त्याने आवागमन असल्यामुळे व मा. पंतप्रधान यांची सुरक्षा सर्वोच्च असल्याने सदर रस्त्याचे त्यावेळेस सुरक्षेचे दृष्टीने व सुलभ वाहतूकीचे दृष्टीने त्वरित डांबरीकरण करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री व मा. उप. मुख्यमंत्री यांनी दिले. त्यानुसार सदर रस्त्याचे तात्काळ एका रात्रीत डांबरीकरण करण्याचे निर्देश मा. जिल्हाधिकारी व मा. आयुक्त, मनपा यांनी दि. 10/12/2022 चे सायंकाळी सदर पाहणी दरम्यान म.न.पा. यंत्रणेस दिले होते.

या अनुषंगाने सदर काम मा. पंतप्रधान यांचे दौ-यापूर्वी संपूर्ण प्रक्रिया करुन पूर्ण करणे शक्य नसल्याने मा. प्रशासक तथा आयुक्त म.न.पा. नागपूर यांनी सदर काम म.न.पा. हॉट मिक्स प्लॉन्ट तर्फे व उपलब्ध होतील त्या कंत्राटदारामार्फत त्वरित करुन घेण्याचे निर्देशित केले. या अनुषंगाने सदर कामाचे क्षेत्र मिहान मध्ये असून नागपूर महानगरपालिका क्षेत्रा बाहेरील आहे. कामाचे स्थळ नागपूर महानगरपालिका हद्दिबाहेर तसेच अधिकार क्षेत्राबाहेरील असल्याने सदर काम करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 अन्वये (स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध संपादन करणे व त्यांचा विनियोग करणे यासंबंधीच्या संविदा धरून, या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी संविदा करण्याच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील त्या अशा :- (अ) आयुक्त, महानगरपालिकेच्यावतीने अशी प्रत्येक संविदा करील; (With respect to the making of contracts under or for any purpose of this Act, including contracts relating to the acquisition and disposal of immovable property or any interest therein, the following provisions shall have effect, namely :- (a) Every such contract shall be made on behalf of the corporation by the Commissioner) व कलम 89 अन्वये (महानगरपालिकेने नगरपालिका निधीमधून करावयाचा खर्च, या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, फक्त शहरातच केला जाईल, परंतु एकूण सदस्यांपैकी निम्म्याहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या महानगरपालिकेच्या ठरावाव्दारे असा खर्च या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी शहराच्या बाहेर करता येईल. (Expenditure by the Corporation out of the Municipal Fund shall, save as otherwise provided by this Act, be made within the City only, but may, by a resolution of the Corporation supported by not less than half the total number of councillors, be made outside the City for any of the purposes of this Act.) काम करणे व या कामांना म.न.पा. अधिनियम प्रकरण ड नियम (2) अन्वये विना निविदा स्था. समिती च्या मंजुरी अन्वये कार्योत्तर मान्यता प्रदान करणे. या अनुषंगाने पूढील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

1) मिहान येथिल TCS Office to Smart Data Enterprises Ltd Square in MIHAN Nagpur पर्यंत 2 Km चा रस्ता डांबरीकरण कामाकरीता कंत्राटदारामार्फत करण्यात आलेल्या कामाचे विस्तृत प्राकलन रु. 11,25,000/- + रु. 2,02,500/- (GST 18% व इतर) असे एकूण रु. 13,60,350/- (प्राकलन संलग्न आहे.) झालेला खर्च यास कार्योत्तर मान्यता प्रदान करणे तथा व्यवस्थापकीय संचालक MIHAN India Ltd. यांना झालेल्या खर्चाची मागणी करणेबाबतचे पत्र पाठविण्यास्तव प्रस्तावित आहे.
2) म.न.पा. हॉट मिक्स प्लॉन्ट विभागाव्दारा उपरोक्त दिलेल्या निर्देशानुसार म.न.पा. हद्दिबाहेर मिहान येथे केलेल्या 1185.90 चौ.मी. डांबरीकरण कामाकरीता रु. 3,57,869/- + रु. 64,416/- (GST 18%) असे एकूण रु. 4,22,285/- झालेला खर्च यास कार्योत्तर मान्यता प्रदान करणे तथा व्यवस्थापकीय संचालक MIHAN India Ltd. यांना झालेल्या खर्चाची मागणी करणेबाबतचे पत्र पाठविण्यास्तव प्रस्तावित आहे.
3) म.न.पा. हॉट मिक्स प्लॉन्ट विभागाव्दारा उपरोक्त प्रमाणे प्राप्त निर्देशानुसार मा. पंतप्रधान यांचे आगमनानिमित्याने एअरपोर्ट येथील व्हि.आय.पी. प्रवेश व्दार येथील खराब रस्ता सुस्थितीत करण्याकरीता केलेल्या 1753.50 चौ.मी. डांबरीकरण कामाकरीता रु. 5,58,963/- + रु. 1,00,613/- (GST 18%) असे एकूण रु. 6,59,577/- झालेला खर्च यास कार्योत्तर मान्यता प्रदान करणे तथा व्यवस्थापकीय संचालक MIHAN India Ltd. यांना झालेल्या खर्चाची मागणी करणेबाबतचे पत्र पाठविण्यास्तव प्रस्तावित आहे.

4) तसेच Asphalting of Road From TCS Office to Smart Data Enterprises Ltd Square in MIHAN Nagpur येथील 2 Km च्या रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम अंत्यत तातडीने मा. पंतप्रधान यांचे दौ-यापूर्वी एका रात्रीत करावयाचे असल्याने त्यावेळी उपलब्ध झालेले नागपूर महानगरपालिकेचे अधिकृत कंत्राटदार M/s Premachan Rachumal, यांच्याव्दारे काम करण्यात आले. त्यानुसार M/s Premachan Rachumal, यांना प्राकलनिय दराने (at Par) रु. 13,60,350/- (GST +Testing +Insurence) राशीचा कार्योत्तर मंजूरी प्रदान करणेसह ठराव कार्यान्वित करुन कार्यादेश प्रदान करणे.

करिता सदर काम करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 अन्वये कराराबाबत, व कलम 89 अन्वये काम करणे(म.न.पा सभागृहाचा कालावधी दिनांक 02.03.2022 रोजी संपुष्टात आल्याने नागपूर महानगरपालिकेत प्रशासकीय राजवट असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 चे पोटकलम 2(क) अन्वये महानगरपालिका व सर्व समित्या यांचे सर्व अधिकार व कर्तव्ये मा.प्रशासक यांना असल्याने“सदस्यांपैकी निम्म्याहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या महानगरपालिकेच्या ठरावाव्दारे अश्या खर्चास मंजुरी घेणे” हि अट लागू असणार नाही) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे परिशिष्ट ड प्रकरण ५ चे कलम २ चे पोटकलम २ च्या परंतुकातील तरतुदी अनुसार 452 चे पोटकलम 2(क) अन्वये, विना निविदा केलेल्या अतितातडीच्या कामास कार्योत्तर मान्यता प्रदान करणे. उपरोक्त नमुद 1 ते 4 प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्याच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**